
# JALGAON BRANCH OF WIRC OF

The Institute of Chartered Accountants of India

(SETUP BY AN ACT OF PARLIAMENT)




E-NEWSLETTER

# PRAYAS
# APRIL 2025

# INSIDE THIS ISSUE


03 MANAGING COMMITTEE OF JALGAON BRANCH OF WIRC OF ICAI

04 CHAIRMAN'S COMMUNIQUÉ

08 कहाणी हूवर धरणाची

19 HUMAN CAPITAL & FINANCIAL PERFORMANCE: A YEAR OF TRANSFORMATION

23 HEALTH CORNER

26 MEMORIES GALORE

31 MEDIA COVERAGE

32 CELEBRATING OUR MEMBERS – BIRTHDAYS THIS MONTH!

33 CROSSWORD PUZZLE

34 DISCLAIMER


---

## EDITORIAL BOARD – NEWS LETTER COMMITTEE


| | | |
|---|---|---|
| CA ANIL SHAH | - | CHAIRMAN |
| CA RAMESH JAIN | - | MEMBER |
| CA MAMTA RAJANI | - | MEMBER |
| CA VINAY KAWDIA | - | MEMBER |
| CA RAVINDRA PATIL | - | MEMBER |
| CA LAXMIKANT LAHOTI | - | EX-OFFICIO |
| CA KARAN KABRA | - | EX-OFFICIO |

# MANAGING COMMITTEE OF JALGAON BRANCH OF WIRC OF ICAI



CA Hitesh Agiwal
(Chairman)



CA Roshan Runwal
(Vice-Chairman)



CA Sohan Nehete
(Secretary)



CA Laxmikant Lahoti
(Treasurer)



CA Karan Kabra
(Member)



CA Nachiket Jakhetia
(Member)



RCM CA Abhishek Dhamne
(Branch Nominee)

# CHAIRMAN'S COMMUNIQUÉ



Dear Professional Colleagues & Students, Namaskar.

"The world is a great gymnasium where we come to make ourselves strong." — Swami Vivekananda

As we continue to tread forward with our annual theme "PRAYAS", symbolising purposeful efforts, resilience, and growth, the month of April brings with it mixed sentiments — a moment of national mourning, professional responsibility, and a renewed sense of duty.

**Tribute to the Bravehearts of Pahalgam**

We begin by offering our heartfelt condolences to the valiant soldiers and civilians who lost their lives in the terrorist attack at Pahalgam. Their supreme sacrifice reminds us of the fragile yet resolute thread that holds our democracy together.

I humbly appeal to all Members and Students of ICAI to stand in solidarity with our Armed Forces. As financial professionals, let us ensure that our integrity, vigilance and commitment to national interest reflect in our work. Let us echo our collective resolve to ensure that our voice and our service to the nation remain a befitting tribute and a firm reply to the enemies of peace.

"Service to the Nation is not limited to the battlefield – it extends to the boardroom, the classroom, and the audit file too."

**ICAI National Developments & Professional Landscape**

Our Institute continues to make giant strides in professional excellence and global relevance:

- New Code of Ethics – Revised Volume II released:

With increased focus on independence and compliance, the latest ethical guidance provides greater clarity to practicing professionals and safeguards public interest.

- Draft Income Tax Bill, 2025:

ICAI is proactively engaged with policymakers to provide feedback on the proposed re-codification of Income Tax Law. Our recent Public Outreach sessions at branch level have amplified citizen awareness and policy feedback.

- Empanelment in Government Audits:

Increased emphasis is being placed on digital empanelment and standardised quality controls for Chartered Accountants involved in audits under various ministries.

- Focus on Sustainability Reporting & ESG:

The ICAI Sustainability Reporting Standards Board is undertaking massive initiatives to prepare Indian professionals for Business Responsibility & Sustainability Reporting (BRSR) compliance, which will soon become mandatory for many companies.

**Jalgaon Branch Initiatives – Continuing our PRAYAS**

Keeping the momentum strong, we are happy to announce the following programs:

- CA Students State Level Conference (14th & 15th June 2025)

The flagship two-day conference will witness participation of over 300+ students and feature sessions by subject matter experts, motivational leaders, and CA trailblazers. I invite all students to attend, learn, and grow in this enriching forum.

- Physical Batch of DISA Course – Launching June 2025

To help our members stay ahead in the era of technology and cyber controls, we are launching a Physical Batch of the Information Systems Audit (DISA) Course at Jalgaon for the first time in years. Interested members may kindly reach out to the branch for details.

- Certificate Courses Under Discussion

Based on feedback from our survey, we are working to bring value-added certificate courses in:

  - UAE Corporate Tax
  - Cooperative Audit
  - Concurrent Audit of Banks
  - Artificial Intelligence in CA Practice

Your continued input and participation will help us finalise modalities.

- Your Participation Shapes Our Growth

Every initiative at the Branch is rooted in member-centric and student-centric values. I sincerely urge each one of you to come forward and actively participate in our activities. Your feedback and suggestions are vital in shaping our efforts and direction. Let us grow together, support each other, and make Jalgaon Branch a model of collaborative excellence. Let us keep the flame of growth and inclusivity alive. I urge you all to:

  - Participate in upcoming programs
  - Guide and mentor students
  - Share your technical articles, poetry, blogs, and creativity for our monthly e-newsletter
  - Share your suggestions to enhance the reach and relevance of our branch

Together, let us make our PRAYAS more impactful, more inclusive, and more visionary.

**In Gratitude & Spirit**

We thank our Hon'ble President CA Charanjot Singh Nanda Sir, Vice President CA Prasanna Kumar D. Sir, and the Central and Regional Councils for leading ICAI with such a forward-looking vision.

Let us remember:

"You cannot cross the sea merely by standing and staring at the water."

— Rabindranath Tagore

Let us all take a moment to reflect on our privileged position as professionals and students, and honour it with responsibility. The road ahead may be challenging, but with dedication in our efforts and devotion to our nation, we shall continue to rise higher – together. So, let's act, let's unite, and let's elevate — in our own way — our branch, our profession, and our country.

**With Best wishes,**

**CA Hitesh Kishor Agiwal**

**(Chairman, Jalgaon WIRC)**

# कहाणी हूवर धरणाची



CA Anilkumar Shah



*(Source: https://www.britannica.com/topic/Hoover-Dam)*

अमेरिकेत जे पाहायचे ठरवून गेलो होतो त्यात ग्रॅन्ड कॅनियन आणि हूवर धरण होते. योग असा होता की, ग्रॅन्ड कॅनियन पहाटे तर दहा वाजेनंतर हूवर धरण असा एकच दिवसाचा हा कार्यक्रम होता.

पहाटे ग्रॅन्ड कॅनियन पाहून आल्यावर हॉटेलला परत येऊन भरपेट नाश्ता केला. ताजेतवाने होऊन परत निघालो हूवर धरण पहायला. जेवण झाले नसल्याने थोडे सुके पदार्थ खायला सोबत घेतले. आमची बस तयार होतीच. धरणावर पोहोचून बसमधून उतरताच उन्हाचा तीव्र चटका जाणवला. नेवाडा राज्य म्हणजे रखरखीत वाळवंटच. जळगांव पेक्षाही तीव्र चटका आणि रखरखीतपणा होता. तोंडाला सारखी कोरड पडत होती.

तिकिटे आमच्या टूर गाईडने काढली आणि प्रवेशद्वारावर नमनालाच झटका लागला. कोणतेही खाद्यपदार्थ आतमध्ये नेण्यास सक्त मनाई होती. अगदी पाकीटबंद पदार्थ जसेच्या तसे ठेवतो म्हटले तरी. बस आम्हाला सोडून निघून गेलेली. टूर गाईडला याची माहिती होती तरी तशी सूचना आम्हाला

द्यायला ते महाभाग विसरले होते. त्यामुळे सर्वांनाच हळहळत सोबतचे सर्व पदार्थ अक्षरशः कचराकुंडीत टाकून द्यावे लागले.

पुढचे तीन तास धरणाचे आणि त्यातल्या वीजनिर्मिती केंद्राचे होते.

अमेरिकेत सर्वत्र पद्धत आहे त्याप्रमाणे धरणाविषयी आधी एक माहितीपट दाखवण्यात आला. त्यात धरणाच्या निर्मिती आधी, दरम्यान आणि नंतरचे नदी, आसपासचा प्रदेश व धरण यांचे चित्रण व सुरेख माहिती. निर्मितीतले अडथळे, अडचणी त्यावर योजलेले उपाय, धरणाची वीजनिर्मितीची भव्यता इ. माहिती चित्रपटातून छान पद्धतीने मांडलेली होती.

जगातल्या सर्वात मोठ्या धरणांपैकी आजही हे धरण एक आहे.  याची अनेक वैशिष्ट्ये आहेत. १९२८ मध्ये याची संकल्पना मांडण्यात आली, तेव्हा अमेरिका प्रचंड मंदीने ग्रासलेली होती. प्रत्यक्ष धरणाचे काम १९३१ ते १९३५ पर्यंत चालले. २१००० पेक्षा अधिकांना रोजगार मिळाला. धरणाच्या आजूबाजूचा परिसर कामगारांच्या आणि त्यांच्या कुटुंबांच्या तांड्यांनी भरून गेला होता.

संपूर्ण कॉन्क्रिटचे बांधकाम हे त्याचे वैशिष्ट्य. बांधकामाचे वजन आहे जवळपास ६६ लक्ष टन. यात वापरलेल्या सिमेंटचा ४ फुट रुंद व ३ इंच जाडीचा पट्टा बनवला तर संपूर्ण पृथ्वीला मध्यभागी विषुवृत्तावर एक वेढा चढेल. ७२६ फुट उंचीचे हे धरण पृथ्वीच्या पश्चिम भागातले आजही सर्वात उंच मानले जाते. हे आधुनिक जगातल्या एकूणच बांधकाम विश्वातल्या सात आश्चर्यांपैकी एक आहे असे अमेरिकेत मानतात. तळाशी याची रुंदी आहे ६६० फुट. म्हणजे एका फुटबॉल मैदानाएव्हढी. संपूर्ण धरणावरून एक सुंदर चार पदरी गुळगुळीत महामार्ग आहे आणि गाड्या त्यावरून सुसाट धावत असतात. मात्र पायी फिरणा-या पर्यटकांसाठी पट्टे आखलेल्या भागातून सर्वच गाड्या स्वतःहूनच अत्यंत धीम्या गतीने जातात.

धरणाच्या बांधकामा दरम्यान एक संपूर्ण घरच उचलून दुसरीकडे नेले. पर्यावरण, विश्तापितांचे प्रश्न इ. कोणत्याही कारणाने सरकारने धरणाचे काम थांबू दिले नाही. बांधकामा दरम्यान सरकार बदलले तरी.

हूवर धरण कोलोरॅडो नदीवर बोल्डर सिटी जवळ असल्याने त्याचे नाव आधी बोल्डर धरण ठेवले होते. सरकारी कागदपत्रात याच नावाने सर्वत्र उल्लेख होता. मात्र तत्कालीन सचिव विल्बर यांनी विद्यमान राष्ट्राध्यक्ष हूवर यांचे नाव सूचित केले. ते स्वत: एक इंजिनियर होते आणि त्यांच्या कार्यकाळातच धरण पूर्ण झाले असा युक्तीवाद विल्बरने मांडला होता. पण १९३२ च्या निवडणुकीत हूवर पडले, रूझवेल्ट अध्यक्ष झाले. त्यानंतर धरण राष्ट्रार्पण सोहळ्यातही बोल्डर याच नावाने धरणाचा

नामोल्लेख झाला. मात्र वर्तमानपत्रे व लोकांमध्ये बोल्डर आणि हूवर या दोन नावांचा आलटून पालटून उल्लेख होऊ लागला. शेवटी १९४७ साली अमेरिकन संसदेच्या दोन्ही सभागृहात या धरणाचे 'हूवर धरण' असे नामाभिधान ठराव मंजूर करून करण्यात आले आणि या नामांतरायणाला पूर्णविराम मिळाला.

हूवर धरणाची पार्श्वभूमी, कोलोरॅडो नदी आणि लास वेगास शहर याभोवती कितीतरी रंजक गोष्टी आहेत.

हूवर धरण आजही एक मोठे धरण आहे. म्हणजे १९३१ मध्ये तर ते एक आश्चर्यच होते. काळाच्या कितीतरी पुढे विचार करून उचललेले मोठे प्रगतीचे पाऊल. आता ९० वर्षांनंतरही त्याची जादू ओसरलेली नाही यावरून त्याची कल्पना यावी.

प्रचंड वेगाने आणि खूप पाणी वाहून नेणा-या कोलोरॅडो नदीला कालवे काढा, त्यामुळे आजूबाजूच्या खास करून कॅलिफोर्निया राज्यातल्या शेतीला पाणी मिळून उत्पादन वाढेल, ह्या शेतक-यांच्या वाढत्या मागणीमुळे कालवे कसे काढता येतील यावर मंथन सूरु झाले.

१८९० मध्ये अमेरिकेने हर्बर्ट एम विल्सन या तंत्रज्ञाला भारतात येथल्या कालव्यांचा अभ्यास करायला पाठवले. याचा संपूर्ण अहवाल आजही अमेरिकन सरकारच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. (http://pubs.usgs.gov/vsp/0087/report.pdf). संदर्भ आलाच आहे तर हेही नमूद करतो की त्याने भारतातल्या शेतीचे जे कौतुक केले आहे त्यावर आज आपला विश्वास बसणार नाही. नैसर्गिक बियाणे, खते आणि तेव्हाच्या भारताला आवश्यकतेपेक्षा दुप्पट अन्नधान्य उत्पादन असलेला संपन्न देश असे भारताचे त्यात वर्णन आहे.

या हर्बर्ट विल्सनने आपला अहवाल १९०१ मध्ये दिला. त्यात कॅलिफोर्निया, नेवाडा यासह कोलोरॅडो नदीचा खास उल्लेख केला आहे. या नदीतून किती दाबाने पाणी वाहते, याचे मोजमाप त्यावेळी अमेरिकेत सुरू होते याचा तपशील आहे. मात्र भारतात असे मोजमापच नाही याचाही उल्लेख त्यात आहे.

कॅलिफोर्निया डेव्हलपमेंट कंपनीने १९०५ मध्ये कोलोरॅडो नदीचे पाणी शेतीसाठी कालवे खोदून वळवले होते. गाळ साचून पाण्याचा प्रवाह कमी होऊ नये म्हणून नदीकाठावर एक मोठा छेद दिला होता. परिणामी कालव्यात पाण्याचा प्रवाह एकदम वाढला, इतका की या खोऱ्यात पुढे २७६ मैलांवर असलेल्या साल्टन या नावाने प्रसिद्ध असलेल्या कोरड्या खोलगट भागात सतत दोन वर्षे धो धो पाणी वाहत जाऊन मोठा जलसाठा तयार झाला. यालाच आज साल्टनचा समुद्र म्हणतात. याचा पसारा आता १५ मैल रुंद व ३५ मैल लांब एवढा झाला आहे. त्यात जवळपास ७.४ घन किलोमीटर इतका जलसाठा असतो.

कोलोरॅडो नदीने पुरामुळे केलेल्या अतोनात नुकसानीचा सर्वांनाच खूप त्रास होत होता. नव्यानेच केलेल्या कालव्याच्या आणि कोलोरॅडोच्या अभ्यासातून १९२२ मध्ये आर्थर पॉवेल डेविस याने संसदेपुढे ॲरिझोना व नेवाडा या राज्यांच्या सीमा भिडतात अशी अतिशय चिंचोळी जागा, ब्लॅक कॅनियनची दरी, ही एका मोठ्या धरणासाठी; आणि त्यापुढे एकूणच संपूर्ण कोलोरॅडोच्या पात्रात ठीक ठिकाणी धरणे बांधून नदीतल्या जवळजवळ संपूर्ण पाण्याचे नियंत्रण व उपयोग करता येईल अशी सर्वंकष योजना मांडली. अमेरिकेची ७ व मेक्सिकोची २ आशा ९ राज्यांना या योजनेचा सरळ फायदा होणार होता.

सर्व अडथळे पार करत राष्ट्राध्यक्ष केल्विन कुलीज यांनी डिसेंबर १९२८ मध्ये बोल्डर कॅनियन प्रोजेक्ट या नावाने या संपूर्ण प्रकल्पाला मंजुरी दिली.

प्रचंड मंदीमुळे धरणाच्या जागी आपल्याला काम मिळेल या आशेने लोकांचे अक्षरशः लोंढेच्या लोंढे तेथे येऊ लागले.

कोलोरॅडो उन्हाळ्यात बर्फामुळे तर वर्षा ऋतूत पावसाने रौद्र रूप धारण करायची. पण थंडीत इतकी मलूल की कालव्यात पाणीच नसायचे. या महाप्रचंड योजनेचा सरकारने उद्देश जाहीर केला, " कोलोरॅडो नदीच्या पुराचे नियंत्रण, पाण्यावरील वाहतूक, जलसाठा आणि नदीच्या पाण्याचा उपयोग निरुपयोगी जमीन शेती व राहण्यासाठी वापरात आणण्यासाठी फक्त अमेरिकेतच करणे."

सरकारने बांधकाम साहित्य पुरवायचे पण बांधकाम मात्र कंत्राटदाराने करायचे या अटीवर निविदा निघाली. सरकारचा खर्च होता १७.५० कोटी डॉलर्स. कंत्राटदाराचा होता पाच कोटी डॉलर्स.

खूप मोठी रक्कम आणि कुशल-अकुशल कामगारांची लागणारी प्रचंड व्यवस्था यामुळे कोणत्याही एका कंपनीची निविदेसाठी तयारीच होईना. त्यासाठी हमी रक्कम भरायची होती दोन कोटी डॉलर्स. पाच कोटी डॉलर्सची हमी सरकारला द्यायची होती. दरमहा मजुरी द्यायची होती पाच लाख डॉलर्स. वेळेची मर्यादा ठरवली होती १९३१ ते १९३७ अशी सात वर्षे.

या मोठ्या योजनेची छोट्या टप्प्यात विभागणी करून त्या प्रत्येक टप्प्यासाठी वेळेच्या मर्यादा नक्की केल्या होत्या. कोणत्याही विलंबासाठी कमीत कमी दंड होता ३००० डॉलर्स प्रतिदिन.

एक एक करत शेवटी सहा वेगवेगळ्या कंपन्या एकत्र येऊन त्यांनी एकत्रितपणे भरलेली निविदा मंजूर झाली ४ कोटी ८९ लाख डॉलर्स खर्चाची. या सर्व सहा कंपन्यांनी एकत्र येऊन एक कंपनी स्थापली. तिचे नावच होते "सिक्स कंपनीज इन्कॉर्पोरेटेड."

धरणाचा सुंदर आणि काळाच्या पुढे पाहणारा महत्वकांक्षी आराखडा तयार केला होता गॉर्डन कॉफमन याने.

धरणाच्या भिंतीचा आकार एखाद्या पिवळसर रंगाच्या जास्वंदाच्या फुलाची आतल्या बाजूला वळलेली एक पाकळी उभी करावी तसा. खाली निमुळती तर वर दोन्ही बाजूला सारखी मोठी होत गेलेली. नारळाच्या वाटी सारखी वक्राकार भिंत. वाटेची वरची बाजू सम पातळीवर दरीच्या दोन्ही काठांना जाऊन भिडणारी. त्यावरून जाणारा वक्राकार गुळगुळीत रस्ता नेवाडा आणि ॲरिझोना राज्यांना जोडतो, जमिनीपासून ७२६ फूट उंचीवर.

कोलोरॅडोच्या पाण्याला जोर खूप. त्यामुळे प्रवाहात धरण बांधणे कठीणच होते. त्यासाठी कॅनियनच्या दरीतून नदीचा प्रवाह बाजूला वळवणे भाग होते. त्यासाठी दरीच्या दोन्ही खडकांच्या भिंतीतून काँक्रीटचे ५० फूट व्यासाचे ७ मैल लांबीचे दोन मोठे बोगदे तयार केले. या बोगद्यांचाच खर्च चक्क धरणा एवढा झाला. यातून नदीचा प्रवाह वळवून धरणाच्या जागेवर काम सुरू झाले.

धरणाच्या भिंतीमागे वीज निर्मितीसाठी पाणी आत घेण्यासाठी दोन्ही काठांना प्रत्येकी दोन टॉवर्स उभारण्यात आले. या टॉवर्स मधून पाणी ३० फुट व्यासाच्या काँक्रीटच्या पाईप मधून आत जाते. उतारामुळे वेगाने वीजनिर्मिती संचात जाते आणि पुढे नदीत सोडून दिले जाते.

५० फूट व्यासाचे बोगदे आता धरणात अतिरिक्त पाण्याचा साठा झाला तर ते पुढे नदीच्या प्रवाहात सोडण्यासाठी वापरतात.

जवळपास २१००० कुशल-अकुशल लोक येथे रोज पाच वर्षे काम करीत होते. काम सुरू झाले तेव्हा जवळच लास वेगास हे एक २५०० उंबऱ्याचे छोटे गाव होते.

सरकारची ही २२.५० कोटी डॉलर्सची योजना आपल्या शेजारीच होणार हे गावकऱ्यांना कळले होतेच. प्रत्येकानेच आपापले डोके चालवत काय काय करता येईल याची लगबग सुरू केली. धरण जाहीर झाल्यावर एका वर्षातच अनेक नवीन बांधकामांना परवाने दिले गेले व लोकसंख्या झाली ७५०० म्हणजे तिप्पट. पुढच्याच वर्षी चार लाख डॉलर्स खर्चून रेल्वेने विस्तारीकरण केले. यासोबतच तिथल्या कोर्टाने वाढीव कज्ज्यांसाठी ८० हजार डॉलर्स खर्चून कोर्टाच्या इमारतीचे विस्तारीकरण केले.

धरणावर कामासाठी येणाऱ्यांचा लोंढा अर्थातच या गावाबाहेरच तंबूतून राहू लागला. सोबतच हातात दोन पैसे आल्यावर तो खर्चायला या गावात येऊ लागला. आधी मजुरी कंपनीचे शेअर्स वा रोख्यांच्या स्वरूपात देण्याचे ठरले होते. पण लास वेगाच्या चतुर लोकांनी " सिक्स कंपनीज" ला ती रोखीने देण्याचा प्रस्ताव मंजूर करून घेतला. त्या दिवसापासून लास वेगास मध्ये रोज पैशांचा छनछनाट

सुरू झाला. धरणाने, पाण्याने, विजेने लास वेगासचे रूप पूर्णतः पालटले. आज ते २० लाखांपेक्षा जास्त वस्तीचे मोठे शहर झाले आहे. दरवर्षी ४० लाख पर्यटक येथे येतात.

धरणाच्या मागे मोठा जलाशय तयार झाला. त्याचे नाव लेक मीड. (हे नाव आलेय - अमेरिकेच्या ब्युरो ऑफ रिक्लेमेशनच्या धरणाच्या काळात कमिशनर होते एलवूड मीड - जे १९३६ मध्ये वारले - यांच्या नावावरून.) ११० मैल लांब, ५०० फूट खोल, १,५६,८०० एकर व दोन्ही बाजूंनी ५०० मैल लांब किनारे, इतका याचा पसारा आहे. पाण्यावरचे खेळ, सुट्ट्या घालवायला उत्तम अशा बारमाही आनंदाच्या जागा येथे तयार झाल्या. येथे दरवर्षी ८० लाखांहून अधिक पर्यटक येतात.

प्रत्यक्ष धरणामुळे ४० लाखांहून अधिक लोकांना रोजच्या वापरासाठी स्वच्छ पाणी मिळाले. १३ लाख घरांना ४०० कोटी किलो वॅट स्वस्त वीज मिळाली. २० लाख एकर जमीन ओलिताखाली आली. ॲरिझोना स्टेट युनिव्हर्सिटीने केलेल्या एका पाहणीचा निष्कर्ष सांगतो की, या धरणामुळे एकूण १६ कोटी लोकांना रोजगार मिळाला तर १४ लक्ष कोटी डॉलर्स आर्थिक उलाढाल या भागात वाढली.

आपल्याकडे राजस्थानात दरवर्षी सरासरी २० ते ३० इंच पाऊस पडतो. त्याला आपण वाळवंट म्हणतो. नेवाडा राज्यात फक्त ७.८७ इंच पाऊस पडतो. यावरून आपण कल्पना करू शकतो की तेथे धरणापूर्वी काय परिस्थिती असेल. या धरणाने नेवाडाचे आर्थिक व सामाजिक गणितच बदलून टाकले आहे.

कोलोरॅडो नदी कॅलिफोर्नियाच्या आखातात दरवर्षी १२.५० कोटी टन कचरा आणि गाळ वाहून आणत होती तो थांबला. या धरण योजने नंतर कोलोरॅडोच्या पात्रात पुढे अनेक धरणांची साखळी तयार करण्यात आली; इतकी की नदीच्या शेवटच्या १०० मैलात आता पाणी जवळजवळ नसतेच. १९६० नंतर ती क्वचितच समुद्राला मिळाली. म्हणजे नदीच्या १०० टक्के पाण्याचे नियोजन झाले. यामुळे आणि पूर्ण पाणी वाटपामुळे साल्टनच्या समुद्रात पाणीच नसणार, असे म्हणतात. (मी हा मूळ लेख २०१६ मध्ये लिहिला होता, तेव्हा २०२१ पर्यंत साल्टनच्या पाण्याची पातळी जवळ जवळ नाहीशी होईल असा अंदाज होता. ती घटली आहेच. आज असा अंदाज सांगितला जात आहे कि २०४७ पर्यंत त्याचा आकार आजच्या पेक्षा २/३ ने कमी होईल आणि त्याचे आरोग्य व पर्यावरणावर अनेक दुष्परिणाम दिसतील.)

अशा राक्षसी वाटणाऱ्या महत्वाकांक्षी पाणी धोरणामुळेच आज अमेरिकेत भारताच्या तुलनेत दर माणशी ४० पट अधिक पाणी उपलब्ध आहे. म्हणजे भारतात माणूस एक बादली पाण्यासाठी वणवण करतो तेव्हा अमेरिकेतला माणूस शॉवर खाली निवांतपणे आंघोळ करत असतो.

उपलब्ध पाण्याचे जवळपास १०० टक्के नियोजन करण्याच्या धोरणामुळे अमेरिकेत सुबत्ता आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. पाण्यापासून वीजनिर्मिती सर्वात स्वस्त. याचा अमेरिकेने पुरेपूर उपयोग केला आहे. शिवाय ही वीज पर्यावरणाचे कोणतेही नुकसान न करता मिळते.

मुबलक पाणी व अत्यंत स्वस्त वीज हे कोणत्याही देशाच्या प्रगतीचे मुख्य मापदंड आहेत हे नव्याने कोणालाही सांगण्याची गरज नाहीच. याच्या परिणामी जगभरातली नव्या पिढीतली बौद्धिक संपदा अमेरिकेने स्वतःकडे खेचून घेतली आहे असे मला वाटते. हूवर धरण ही या सगळ्याची सुरुवात होती म्हणून त्याचे इतके महत्व. त्याच्या ९० वर्षांच्या अनुभवाने हे आपल्या सर्वांना स्वच्छ दिसतेच.

या धरणांच्या अतिरेकामुळे अमेरिकेत आता कोणती धरणे पर्यावरणाचे अतोनात नुकसान करतात, ती तोडा, पाडून टाका या मागणीचा जोर धरू लागला आहे. या सगळ्या साखळीत छोटी धरणे पाडली जाण्यास हरकत नाही, असा सूर सर्वत्र आहे, काही पाडली देखील. पण मोठ्या धरणांमुळे अतोनात फायदा झाला आहे हे सर्वच मान्य करतात. (असे नॅशनल जिओग्राफिक च्या २७ ऑगस्ट २०१४ च्या अंकात सुद्धा अनेकांनी म्हटलेय.)

सिक्स कंपनीजने काम कोठे रेंगाळू न देता, वेळेच्या दोन वर्षे आधी, म्हणजे १९३५ मध्येच पूर्ण केले. अशा या बहुचर्चित व बहुआयामी हूवर धरणाचे एका शानदार सोहळ्यात ३० सप्टेंबर १९३५ रोजी राष्ट्राध्यक्ष फ्रँकलीन रुझवेल्ट यांनी २०,००० लोकांच्या साक्षीने उद्घाटन आणि लोकार्पण केले.

अमेरिकेत भारतापेक्षा ३३ टक्के पाऊस कमी पडतो असे अमेरिकेची अधिकृत आकडेवारी सांगते. पण पडलेल्या पावसाच्या ८५% पाण्याचे नियोजन केले जाते. (आपल्या कडे हेच प्रमाण फक्त १५% आहे - जलसंवाद व त्या सारख्या अनेकांनी दिलेल्या आकडेवारी वरून.) दुष्काळ असला तरी पिण्याच्या पाण्याची क्वचितच ददाद जाणवते. येणाऱ्या काळात पाणी हेच युद्धाचे कारण असण्याची शक्यता आहे, असे खुद्द युनो वगैरेंनी सांगण्याच्या कितीतरी आधी अमेरिकेने यासाठी पावले उचलली.

साऱ्या जगाची फौजदारी आणि स्वतःचे पुढारले पण टिकवण्यासाठी पाण्याची फक्त स्वतःच्या देशात उत्तम व्यवस्था करून ते थांबले नाहीत. तर इतर देशात पाणी प्रश्नावर संपन्नता होऊ द्यायची नाही यासाठीही अनंत कारस्थाने अनेक देशात त्यांनी घडवली. म्हणून अमेरिका स्वतःच्या तोंडाने न बोलता इतर देशात इतरांच्या खांद्यावर ठेवून अनेक अडथळ्यांच्या बंदुकी नर्मदे सारख्या पाणी प्रकल्पांवर चालवते.

श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी "स्वतःचा आयडी आणि पासवर्ड हरवलेला देश" या अभ्यासपूर्ण लेखात ( अंतर्नाद, मार्च २०१५) व "समग्र माते नर्मदे" या पुस्तकात खास करून नर्मदा नदीवरील सरदार

सरोवर प्रकल्पाविषयी विस्तृत माहिती दिली आहे. शिवाय भारत सरकारच्या रॉ व आयबी या विभागांनी याविषयी बरीच माहिती संकलित करून सरकारला अहवाल दिला आहे.

हूवर धरणाचे फायदे माहीत असल्याने अमेरिकेच्या पाठिंब्याने एकटे नर्मदा धरण होऊ नये यासाठी जगातल्या १३ देशात ५३ गैर सरकारी संस्थांचे पीक नेमके नर्मदा धरणाचे काम सुरू व्हायच्या वेळेस उगवले. सर्व जगभर निदर्शने करून धरण होऊ नये याचा पुरेपूर प्रयत्न या उपटसुंभ संस्थांनी आरडाओरडा करत केला. त्यात सामाजिक कार्यकर्त्यांच्या स्वरूपात बुजगावणी उभी केली.

आपल्या मायबाप सरकारांनीही पाणी व वीज या अत्यंत ज्वलंत प्रश्नांची अक्षम्य हेळसांड केली. सरदार पटेल यांनी १९४७ मध्ये नर्मदा प्रकल्पाचा प्रस्ताव मांडला होता. धरण व्हायला १९८८ साल उजाडले. ४१ वर्षे आपण इतक्या मोठ्या भूभागाला, माणसांना, निसर्गाला, गुराढोरांना पाण्यावाचून तरसत ठेवले. तितक्या काळातले पीक, वीज, माणसे इ. सर्वांचेच अनंत नुकसान केले. शिवाय धरणाचा खर्च कैक पटींनी वाढला तो वेगळाच.

हूवर धरण १९३५ म्हणजे प्रस्तावित वेळेच्या दोन वर्षे आधीच बांधून पूर्ण झाले हे पाहिले की आपल्या निर्णय प्रक्रियेची, राज्यकर्त्यांची कीव येते. दूरदृष्टीचा अभाव एखाद्या पाऊस संपन्न देशाला कसा रस्सा तळाला घेऊन जातो याचे पाण्याच्या बाबतीत भारत हे जगातले सगळ्यात ठसठशीत उदाहरण असावे.

महाराष्ट्र राज्य सरकारने प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार १९९९-२००० मध्ये राज्यात ३२.९६ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली होती, तर २००९-१० मध्ये १० वर्षांनंतर ३२.५४ लाख हेक्टर! याच १० वर्षात राज्याचे ७५ हजार कोटी रुपये सिंचनावर खर्च झाले आणि तितकेच किंवा त्यापेक्षा अधिक अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अजून लागतील.

देशाचा २०११-१२ चा आर्थिक पाणी अहवाल सांगतो की महाराष्ट्रात एकूण जमिनीच्या १७.७ टक्के जमीन ओलिताखाली आहे तर देशाची ही सरासरी ४५.३ टक्के आहे. शिवाय राज्यातील धरणांची संख्या संपूर्ण देशात सर्वात जास्त आहे. तरीही महाराष्ट्रात देशाच्या सरासरीपेक्षा निम्मेही जमीन सिंचनाखाली नाही.

देशातल्या मोठ्या व मध्यम सिंचन प्रकल्पा खालील क्षेत्र १९९१-९२ मध्ये होते तितकेच २०११-१२ मध्ये होते! देशाचा झालेला खर्च, अजिबात न वाढलेले ओलिताखालील क्षेत्र आणि दुष्काळ या सगळ्यांची हूवर धरणाच्या पार्श्वभूमीवर आपण संगती कशी लावायची?

मला कधीकधी प्रश्न पडतो, ज्या सरदार वल्लभभाईंच्या नावाने नर्मदा धरण उभे आहे त्यांनी नर्मदा धरण विरोधी आंदोलन कसे हाताळले असते? त्यांनी संस्थानिकांची ५०० पेक्षा अधिक संस्थाने भारतात विलीन करून स्वतंत्र भारताला असंख्य शकले होण्यापासून वाचवले. त्याचा संपूर्ण इतिहास वाचला किंवा एकूणच सरदारांनी अतिशय तणावपूर्ण, वेगवान घटना घडत असताना त्या सर्वांच्या पलीकडे बघत ज्या कणखरतेने, शांतपणे कडक दूरदृष्टीने निर्णय घेतले; शिवाय या सगळ्यात विरोधकांचीही वाहवा मिळवली ते पाहता त्यांनी नर्मदा विरोधी आंदोलन शांतपणे अगदी थोड्या वेळातच हाता वेगळे केले असते यात शंका नाही. कारण धरणाचा प्रस्ताव त्यांचा होता, म्हणजे तो पूर्ण विचारांतीच त्यांनी मांडला असणार आणि तो तडीस नेण्यासाठी येणाऱ्या अडचणीही त्यांनी आधीच अपेक्षिल्या असणार. कदाचित धरण विरोध हा अमेरिकेला सुचलेला अविचार वल्लभभाईंच्या नुसत्या असण्यानेच बारगळला असता.

आपण पाण्याचा जमाखर्च कोणत्याही सरकारी व निमसरकारी हिशोबात मांडत नाही. त्यामुळे त्याचे ऑडिट ही करीत नाही. जगात सरासरी ११०० मि.मी. पाऊस पडतो तर भारतात ११७० मि.मी. पण भारतात वर्षाला अमेरिकेसारखा २०० दिवस पाऊस थोडा थोडा पडला असे होत नाही. बहुतेक ठिकाणी १०० दिवसांपेक्षा कमीच पडतो. बहुतांश ठिकाणी १०० दिवसातल्या १०० तासातच एकदम पडून जातो. त्यामुळे पावसाच्या पाण्याची साठवण अति आवश्यक आहेच.

यासाठी धरणे आवश्यकच. पण त्यात मोठी की लहान धरणे असा विरोधाभास उभा केला जातो. प्रत्येक धरणाची स्वतःची उपयोगिता आहे आणि ती त्या त्या ठिकाणच्या परिस्थितीनुसार ठरते. उपलब्ध साधनांचा, जागेचा इ. जास्तीत जास्त उपयोग, कमीत कमी नासाडी, कमीत कमी खर्च या सर्व घटकांचा उत्कर्ष बिंदू साधेल असे धरण हवे असते. शिवाय धरण झाल्यानंतर त्याचा दैनंदिन व दुरुस्ती, पाणीपुरवठा, वीजनिर्मिती यांचाही खर्च कमीत कमी राहील हे पहावेच लागेल.

अँड्र्यू केल्लर, आर. सक्थीवादीवेल व डेव्हिड सेक्लर यांनी इंटरनॅशनल वॉटर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटसाठी जागतिक स्तरावर उपलब्ध पाण्याचे नियोजन यावर एक सर्वंकष शोधा अहवाल तयार केला. त्यात त्यांनी इ.स. २०२५ ते २०५० पर्यंत पाण्याची काय परिस्थिती असेल याचा उहापोह केला आहे.

त्यांच्या मते पाणी साठवण्याचा, सांभाळण्याचा आणि साठ्यातून पाणी पुरवण्याचा खर्च मोठ्या धरणांचा लहान धरणांपेक्षा निश्चितच कमी असतो याचा जगभराच्या शोधावर आधारीत तक्ताच त्यांनी दिला आहे -

| **साठ्याचा प्रकार** | **खर्च रु. प्रति १००० घनमीटर पाणीसाठा** |
|---|---|
| मोठी धरणे | ५२० ते ७,१५० |
| लहान व मध्यम | ३,२५० ते २२,७५० |
| लघु बंधारे | १०,४०० ते ३९,००० |
| कालवे | ३२,५०० ते ७८,००० |
| मिठागरे | १०,४०० ते १,३०,००० |

*(https://www.ircwash.org/sites/default/files/Keller-2000-Water.pdf)*

(वरील अहवालात मूळ आकडेवारी डॉलर्स मध्ये असून रुपये हा लेख लिहिला तेव्हाचे २०१६ चे आहेत.आताच्या किमतीनुसार त्यात बदल होईल.)

भारताची लोकसंख्या वाढत जाऊन २०५० पर्यंत १५८ कोटींच्या आसपास स्थिरावेल तेव्हा आपल्याला ९७,३०० कोटी घनमीटर पाणी लागणार आहे. (शेती, पिण्यासाठी, औद्योगिक, जलवाहतूक, पर्यावरण इत्यादीसाठी). पडणाऱ्या पावसाचा व व उपलब्ध पाण्याचा पुरेपूर वापर केला तरच इतके पाणी जेमतेम हाताशी मिळेल. शिवाय इतक्या मोठ्या लोकसंख्येला अन्नधान्यही पुरवावे लागेल. याचा अर्थ येथून पुढे भारताने पाण्याच्या बाबतीत थोडाही हलगर्जीपणा केलेला चालणार नाही. (डॉ. सी. डी. थत्ते, सेक्रेटरी जनरल, इंटरनॅशनल कमिशन ऑफ इरिगेशन अँड ड्रेनेज, नवी दिल्ली यांचे १६ व्या इंडियन इंजीनियरिंग कॉंग्रेस, डिसेंबर २००१ चे भाषण).

धरणाच्या कामाबाबत चीनचे अगदी अलीकडचे उदाहरण पाहण्यासारखे आहे. जगातल्या ॲमेझॉन व नाईलनंतर तिसऱ्या मोठ्या यांगत्से नदीवर " थ्री गॉर्जेस" हे महाप्रचंड धरण चीनने बांधले. तेथे वीज निर्मिती होते २२,५०० मेगावॅट. जगातल्या इतर कोणत्याही धरणापेक्षा ही अधिक आहे. या बांधकामात १३ लाखाहून अधिक लोक विस्थापित झाले. (चीनच्या पोलादी भिंतीतून जगासाठी पाझरणारी माहिती जितकी दिसते त्यापेक्षा अधिक असण्याची शक्यता. या आकड्यावर भरपूर वादविवाद आहेत.) अनेक जुन्या वास्तू पाण्याखाली गेल्या, पण स्वस्त वीज निर्मितीत चीनने मोठीच बाजी मारली. यामुळे कोळशाचा वापर दरवर्षी ३१० लाख टनांनी कमी झाला. यामुळे अक्षरशः कैक हजार टनांनी वायु प्रदूषण कमी झाले.

चीनच्या या धरणाशी संबंधित अभियंत्यांना अमेरिकेत बोलावले होते. त्यांना एवढे अवाढव्य धरण प्रस्तावित वेळेपेक्षा बरेच आधी कसे पूर्ण झाले असे विचारता, अभियंत्यांनी उत्तर दिले की इतर

धरणा सारखा प्रस्ताव खालून वर न जाता, वरून खाली आदेश आला. त्यासह सक्त ताकीदच होती की, पैसे कमी पडणार नाहीत, पण कोणतीही अडचणही ऐकून घेतली जाणार नाही, आवश्यक तेथे पोलीस, वेळ पडल्यास सैन्यबळ वापरा. हे चांगले की वाईट यावर प्रदीर्घ चर्चा व भिन्न मते असू शकतात. पण देशहितापुढे इतर सर्व गौण असायलाच हवे याबाबत मात्र कुणाचेही दुमत नसावे.

हूवर धरणाचे वीज निर्मिती केंद्र गेली ९० वर्षे अव्याहतपणे स्वस्त वीज उत्पादन करते. नेवाडा राज्य तसे एकदम रुक्ष वाळवंटच. पण धरणाजवळच्या लास वेगास शहरात अक्षरश: यक्ष नगरी उभी राहिली. तेथे वीज व पाणी हूवर धरणाचेच. संपूर्ण जगातले पर्यटक स्वतःचे पैसे अक्षरशः उधळण्यासाठीच तेथे येतात. पाणी व वीज नसती तर इतक्या संख्येने येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांचे उत्पन्न या शहराला व त्या देशाला मिळणे शक्यच नव्हते.

धरण पूर्ण झाल्यावर खूप लोक ते पाहायला येऊ लागले. १९३७ मध्ये म्हणजे दोन वर्षातच धरण पाहण्याची रीतसर व्यवस्था व्यवस्थापनाने केली. त्याला तिकीटही लावले. तेव्हा याचे तिकीट होते २५ सेंट. मी भेट दिली २२ जून २०१५ रोजी तेव्हा त्याचे तिकीट होते १० डॉलर तर वीज निर्मिती केंद्रासाठी १५ डॉलर. २० लाख पर्यटक दरवर्षी तेथे भेट देतात. म्हणजे आजच्या डॉलरच्या भावाप्रमाणे एकूण रु. ४३५ कोटी उत्पन्न. फक्त निम्मे लोक तिकीट काढत असतील असे गृहीत धरले तरी रु. २१७.५० कोटी उत्पन्न दर वर्षाचे झाले. या उत्पन्नापैकी फक्त २५% उत्पन्नाचे तुकडे विघ्नकर्त्या गैरसरकारी अडथळा निर्मिती संस्थांपुढे फेकले तरी हूवर धरणाच्या गंगाजळीतल्या पोटातले पाणीही हलायची शक्यता नाही. म्हणजे पर्यटकांच्या जोरावर भारतासारख्या देशात उच्छाद.

आम्ही वीज निर्मिती केंद्राचे तिकीट काढले होते. मधला काही भाग सोडला तर संपूर्ण केंद्र पूर्णतया वातानुकूलित होतेच; पण वीज निर्मिती केंद्रासकट सर्वत्र प्रसन्न करणारी स्वच्छता होती. कोठे कागदाचा कपटा देखील नव्हता. प्रत्येक ठिकाणी माहिती देणारी जाणकार माणसे होती. प्रकल्पाची हसत खेळत माहिती आणि हसतमुख राहून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सुद्‌धा ती देत होती.

अशी व्यवस्था चोख असेल तर मोजलेल्या डॉलर्सचे मोल वाटेनासे होते. पण भारतासारख्या देशात त्याच पैशांनी मांडलेला उच्छाद पाहिला की मन विषण्ण होते.

# HUMAN CAPITAL & FINANCIAL PERFORMANCE: A YEAR OF TRANSFORMATION



CA Laxmikant Lahoti

## "Nurturing Growth: Investing in Employee Development"

The gentle rhythm of the early monsoon rain outside echoed the quiet anticipation inside the training room of the Office. For most employees, it was just another Monday, but for **Ms. Priya**, a senior associate in the Technical Support division, it marked a personal turning point.

Priya had been with the organization for over 11 years. Known for her discipline, punctuality, and deep domain knowledge, she had built a reputation as someone dependable—someone who could be counted on to "get the job done." But in the ever-evolving corporate landscape, consistency was no longer enough. While Priya's work ethic remained stellar, she felt increasingly out of sync with the new tools, platforms, and jargon now commonplace in team meetings—terms like **process automation**, **data visualization**, and **operational dashboards**.

Her moment of reckoning came during a monthly review meeting when the team leader discussed an internal audit observation about long response times in handling service tickets. One of the junior analysts suggested leveraging AI-based ticket routing. Priya found herself lost in the conversation. Though she understood the pain points, she didn't have the vocabulary—or confidence—to contribute meaningfully. That evening, she quietly reflected on how her relevance might be slipping.

### The Turning Point: Project Udaan

Just a week later, the HR department launched **“Project Udaan”**, an in-house employee upskilling program designed to reskill and re-energize mid-level employees through structured learning modules. The focus was clear—bridge the growing gap between institutional experience and emerging technologies. For Priya, the email announcing the program felt like a door creaking open.

Initially skeptical, she wondered if she was too late in her career to start learning afresh. She hadn’t taken a formal course since college. But her daughter, a management trainee with a software company in Pune, encouraged her. “Aai,” she said, “the world isn’t changing fast. It’s already changed. You just have to step in.”

Priya enrolled.

### Learning in Motion: From Doubt to Discovery

The structure of Project Udaan was pragmatic and accessible. Weekly sessions on topics like **workflow automation**, **process mapping**, **Microsoft Power BI**, and **basic data analytics** were combined with hands-on assignments and peer group projects. The sessions were facilitated by both internal domain experts and external trainers.

Priya gravitated toward modules on **process optimization**. Her years in technical support had given her a deep understanding of ground-level challenges, even if she had never previously formalized them into a process model.

In one group activity, Priya teamed up with Ankit, a young software engineer just two years into the organization, and Sheetal, a management graduate working in client coordination. Their project: improve the handling and turnaround time for internal service tickets, which had become a key bottleneck affecting project billing and customer satisfaction.

### The Breakthrough: When Ideas Meet Experience

What unfolded was a beautiful collaboration of youth and experience. Ankit

brought in the latest tools. Sheetal contributed with stakeholder mapping. But it was Priya who identified the biggest inefficiencies—duplicate tickets, redundant approvals, and misaligned ticket assignments due to lack of specialization-based routing.

The team proposed a **Smart Routing Framework**, using a rules-based logic tree that matched each service ticket to the technician based on expertise, availability, and ticket severity. While not as complex as an AI model, the system was intuitive, implementable, and scalable with the organization's existing ERP.

They named it "**Pragati Path**"—the path to progress.

Once piloted in a single division, **ticket resolution time dropped by 27%**. Employee satisfaction within that division saw a spike of 18%. More importantly, the SLA (Service Level Agreement) adherence rate improved to 91%, up from 72%. These numbers caught the attention of the branch leadership.

Over the next two months, the framework was adopted across functions. The financial results spoke volumes:

- **Reduction in penalty costs due to SLA breaches:** ₹4.2 lakhs quarterly
- **Faster closure leading to quicker invoicing:** Revenue inflow advanced by 12 days on average
- **Improved client retention through better service delivery:** Net impact estimated at ₹18 lakhs for the quarter

**The Cultural Shift: One Spark Lights Many Lamps**

The real transformation, however, was not confined to just metrics.

Priya—once hesitant to even speak in meetings—was invited to present her team's model in the quarterly all-branch review. Her calm, clear articulation not only impressed the management but moved many peers to tears. She shared, "This program didn't just teach me software—it reminded me that I still matter."

Her story spread across the organization like wildfire. Employees who had previously dismissed learning opportunities as "not for me" began to re-evaluate. Enrolments in Project Udaan doubled in the next cycle. A new culture

was taking root—one that celebrated **learning agility over age**, **curiosity over credentials**, and **growth over comfort**.

She began mentoring other women employees who were hesitant to reskill, especially those returning from maternity or long breaks. HR even created a special "Priya Circle" mentoring pod to formalize this mentorship model.

In a town hall meeting, the CEO of the company summed it up succinctly:

"We used to talk about human capital as an asset. But Priya's journey reminded us—human capital is not an asset to be used; it's a garden to be cultivated. When you invest in it, the financial fruits will always follow."

**Conclusion: Growth That Pays**

In organizations across industries, learning is often viewed as an expense—something optional, nice to have, or reserved for a chosen few. But the story of Ms. Priya proves otherwise. Her journey shows that investing in human development creates not just smarter employees, but smarter businesses.

In times where machines can do more, it is the **human touch, human adaptability, and human growth** that will set apart great organizations from the good ones. Human capital is not just a line item on a balance sheet—it's the force that drives every other line.

So, let us look around, beyond designations and degrees, and ask: **Who is our next Priya waiting to soar?**

Will connect back next month on the thought – 'Team Collaboration: Roadmap to Success or Unionism?'

# HEALTH CORNER




Dr. Chetan V. Patil
MBBS, DOMS, DNB (Ophthalomology), MRSPH (London)

Well eye care is the most neglected part amongst the professionals who are heavy computer users like Chartered accountants & Engineers not because they willfully ignore it but because they think that nothing happens to eyes even if you have longer screen time, But that's not the case.

If you use screen at least 6-8 hours a day (It includes mobile, TV, Computer etc.) this is for you: -

Protecting your eyes is crucial to prevent digital eye strain (also known as computer vision syndrome).




Here are key tips for eye care:

**1. Follow the 20-20-20 Rule**

Every 20 minutes, look at something 20 feet away for at least 20 seconds. This helps relax your eye muscles.




**2. Adjust Your Screen Settings**

Brightness: Match screen brightness to your environment.

Text size and contrast: Make sure text is easy to read.

Color temperature: Reduce blue light by adjusting your display settings or using blue light filters or blue blocking glasses, especially at night.

**3. Use Proper Lighting**

Avoid glare by using soft ambient lighting. Position your screen to reduce reflections from windows or lights.

**4. Blink More Often**

The most ignored part is blinking. Staring at screens reduces your blink rate, which can dry out your eyes. Remind yourself to blink frequently or use artificial tears if necessary.

**5. Correct Monitor Position**

Place your screen 20–30 inches from your eyes, with the top of the screen at or just below eye level.

**6. Consider Computer Glasses**

If you wear glasses, ask your eye doctor about lenses specifically designed for computer work.

**7. Maintain Eye Hygiene**

Avoid rubbing or touching your eyes with unclean hands.

**8. Regular Eye Exams**

Get your eyes checked annually to update your prescription and monitor for any issues related to screen use.

**Here are some additional practical eye care tips for the summer season, when heat, dust, and UV rays can take a toll on your eyes: -**

**1. Wear UV-Protective Sunglasses**

Use sunglasses that block 100% of UVA and UVB rays to protect against sun damage, cataracts, and macular degeneration.

**2. Stay Hydrated**

Drink plenty of water to prevent dry eyes, which are more common in hot, dry conditions.

**3. Avoid Direct Sunlight**

Try to stay in shaded areas during peak sun hours (10 a.m. to 4 p.m.) and wear a wide-brimmed hat for extra protection.

**4. Protect your eyes against allergens**

Summer allergies can cause itchy, watery eyes. Keep windows closed on high pollen days and avoid rubbing your eyes. Show eye care professionals if the problem persists for more than 24 hours.

**5. Limit Screen Time Outdoors**


Bright light and glare make digital screens harder to read and increase eye strain. Use anti-glare screens or avoid using devices in direct sunlight.

# MEMORIES GALORE

## Public Outreach Programme on Income Tax Bill 2025 dated 17-04-2025





Lightening of Lamp with eminent dignitaries



CA Hitesh Agiwal felicitating Shri. Hitendra Pawar, Jilha Karyavahak



CA Roshan Runwal felicitating Shri. Ajabsingh Patil Chairman Jalgaon Government Servant's Society



CA Hitesh Agiwal felicitating CCM CA Piyush Chhajed, Chairman, Direct Taxes Committee, ICAI



Opening Remark given by CA Hitesh Agiwal



Audience Attendance



Jalgaon District Tax Practitioner's Asociation CA Anilkumar Shah sharing thoughts



Jalgaon Jilha Urban Co-operative Association Chairman Shri. Chandrahas sharing his views



Jalgaon Janta Sahakri Bank Ltd. Past Chairman Shri. Sanjay Birla addressing the gathering



Jalgaon Government Servant's Society Chairman Shri. Ajabsingh Patil sharing his thoughts



Shri. Hitendra Pawar, Jilha Karyavahak sharing his knowledge



CCM CA Piyush Chhajed, Chairman, Direct Taxes Committee, ICAI guiding the audience about Income Tax Bill 2025

## Full Day Seminar on Income Tax dated 18-04-2025



Inauguration session with lightening of lamp in the Seminar on Income Tax with eminent dignitaries




CA Hitesh Agiwal felicitating CCM CA Arpit Kabra




CA Hitesh Agiwal giving his opening remarks




CCM CA Arpit Kabra sharing his views




CA Laxmikant Lahoti presenting memento to CA Piyush Bafna in the session on Basics of International Taxation and Practical Aspects of Form 15CA & 15CB Compliance




CA Piyush Bafna sharing his knowledge about Basics of International Taxation and Practical Aspects of Form 15CA & 15CB Compliance



Members attendance




CA S. R. Maniyar presenting memento to CA Pranav Ashtikar in the session on Taxation of Trust including changes proposed in New Income Tax Bill, 2025 & impact on accounting processes



CA Pranav Ashtikar guiding the members on Taxation of Trust including changes proposed in New Income Tax Bill, 2025 & impact on accounting processes





CA Vinay Kawdia presenting memento to CA Sanjeev Mutha in the session on Reassessment under Section 148 and Available Remedies under the Income Tax Act processes



CA Saneev Mutha sharing his knowledge about Reassessment under Section 148 and Available Remedies under the Income Tax Act processes




CA Gopal Pimplikar presenting memento to CA Darshan Jain in the session on Decoding the New Provisions of TDS




CA Darshan Jain guiding the members about Decoding the New Provisions of TDS

## Condolence Gathering on 25-04-2025 for Pahalgam Terror Incident





# MEDIA COVERAGE

**दिव्य मराठी — दिव्य सिटी**

जळगाव, शनिवार, १९ एप्रिल २०२५ | चैत्र कृ. ६, शके १९४७

## आयकर विधेयक अर्थव्यवस्था बळकटीकरण, करदात्यांसाठी खूपच लाभदायक ठरणार

### सी. ए. शाखेच्या नवीन विधेयक जनजागृती कार्यक्रमात मान्यवरांचा सूर

प्रतिनिधी | जळगाव

सी. ए. शाखेतर्फे आयकर विधेयक २०२५ या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम घेतला. यात अर्थव्यवस्था बळकटीकरणासह करदात्यांसाठी आयकर विधेयक २०२५ लाभदायी ठरणार असल्याचा सूर उमटला.

कार्यक्रमाच्या उदघाटन सत्रासाठी मुख्य अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक हितेंद्र पवार, ग. स. सोसायटीचे अध्यक्ष अजबसिंग पाटील, प्रमुख वक्ते केंद्रीय परिषद सदस्य सी. सी. एम. सी. ए. पीयूष छाजेड उपस्थित होते. चर्चासत्राच्या प्रास्ताविकात सी. ए. हितेश आगीवाल यांनी भारतीय सनदी लेखापाल संस्था (आय.सी.ए.आय.) विषयी व जळगाव सी.ए. शाखेविषयी माहिती दिली. या वेळी उपाध्यक्ष व विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष सी.ए. रोशन रुणवाल, जळगाव जिल्हा कर सल्लागार संघटनेचे अध्यक्ष सी.ए. अनिलकुमार शहा, जळगाव जिल्हा अर्बन को-ऑप. संघटनेचे अध्यक्ष चंद्रहास गुजराथी, जळगाव जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष संजय बिर्ला, जळगाव जिल्हा कर सल्लागार संघटना, जळगाव जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन, रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्ट, जळगाव जिल्हा व्यापारी महामंडळ, जळगाव इंडस्ट्रीअल डेवलपमेंट असोसिएशन, कॉनफेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स या व्यापारी संघटनांचे पदाधिकारी व सभासदांना उपस्थित होते.

**अनुपालन सुलभ करणे सुलभ :** कार्यक्रमात हितेंद्र पवार, अजबसिंग पाटील यांनी सी.ए. यांनी रोजच्या बदलणाऱ्या कायद्यांचा अभ्यास करून अपडेट राहावे लागते. भारताला महाशक्ती बनवण्यामागे सी. ए. खूप मोठी भूमिका बजावत आहे आणि यापुढेही बजावत राहतील असे सांगितले. पीयूष छाजेड यांनी नवीन आयकर विधेयकामुळे करदाते आणि प्राप्तिकर अधिकाऱ्यांसाठी अनुपालन सुलभ होईल. यात अधिक संरचित आणि सुव्यवस्थित कर प्रशासन प्रक्रिया आहे आणि त्यात आधुनिक अनुपालन यंत्रणेचा वापर समाविष्ट आहे. विधेयकात कर वसुली आणि अपील प्रक्रियेत सुधारणा करणाऱ्या तरतुदी असल्याचे सांगितले.

**लोकमत — हॅलो जळगाव**

रविवार २० एप्रिल २०२५

epaper.lokmat.com

## 'आयकर विधेयक २०२५' विषयावर जनजागृती

### मान्यवरांनी केले विविध विषयावर मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जळगाव सी.ए. शाखेमध्ये 'आयकर विधेयक २०२५' या विषयावर जनजागृती कार्यक्रम झाला.

उद्घाटनप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाहक हितेंद्र पवार, प्रमुख पाहुणे म्हणून जळगाव ग.स. सोसायटीचे अध्यक्ष अजबसिंग पाटील तर प्रमुख वक्ते म्हणून सी.ए. पीयूष छाजेड उपस्थित होते. जळगाव सी.ए. शाखेचे अध्यक्ष हितेश आगीवाल, उपाध्यक्ष व विद्यार्थी शाखेचे अध्यक्ष रोशन रुणवाल, कार्यकारी मंडळ सदस्य नचिकेत जाखेटिया, सहकारी सदस्य हितेश जैन, जळगाव जिल्हा कर सल्लागार संघटनेचे अध्यक्ष अनिलकुमार शहा, जळगाव जिल्हा अर्बन को-ऑप. संघटनेचे अध्यक्ष चंद्रहास गुजराथी, जळगाव जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष संजय बिर्ला आदी उपस्थित होते.


प्रास्ताविक हितेश आगीवाल यांनी केले. उपस्थितांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन श्वेता दीक्षित यांनी केले तर नचिकेत जाखेटिया यांनी आभार मानले.

# CELEBRATING OUR MEMBERS –

# BIRTHDAYS THIS MONTH!

| S.No. | Date | Name | Mobile No |
|---|---|---|---|
| 1 | 02-May | CA Govardhan Chopde | 9545588337 |
| 2 | 04-May | CA Anil Shah | 9422276902 |
| 3 | 05-May | CA Nilhil Bedmutha | 9423768866 |
| 4 | 05-May | CA Kirti Lanke | 9823368311 |
| 5 | 06-May | CA Ravi Katariya | 9370079777 |
| 6 | 09-May | CA Suneet Deshpande | 9890060136 |
| 7 | 11-May | CA Yogita Ganesh Sonar | 9561757337 |
| 8 | 13-May | CA Sunny Gadiya | 9422593628 |
| 9 | 14-May | CA Jitendra Gandhi | 9822012500 |
| 10 | 14-May | CA Mayuri Ashok Bhutada | 9403096564/8788024529 |
| 11 | 17-May | CA Anand Kankariya | 9373591789 |
| 12 | 17-May | CA Ashwinkumar Patil | 9637815890 |
| 13 | 18-May | CA Bhushan Agrawal | 9421523279 |
| 14 | 18-May | CA Saburuddin S. Shaikh | 9579379460 |
| 15 | 20-May | CA Sadashiv Pawar | 9665090528 |
| 16 | 21-May | CA Sunil Lalwani | 9823024000 |
| 17 | 22-May | CA Kapil Girdhar Patil | 9665373133 |
| 18 | 23-May | CA Sarthak Rajeev Chopada | 9405738619 |
| 19 | 24-May | CA Sumit Bhutada | 8600013547 |
| 20 | 25-May | CA Rahul B. Jain | 9823156810 |
| 21 | 26-May | CA Prashant B. Tiwari | 9403426777 |
| 22 | 31-May | CA Rajesh Kalantri | 9422782207 |
| 23 | 31-May | CA Trupti Neeraj Rathi | 8956651991 |

# CROSSWORD PUZZLE




**Across:**

3. Type of audit required under Section 44AB

7. Audit trail in accounting ensures this (starts with "T")

8. International body issuing accounting standards (abbr.)

9. Mandatory annual filing for companies (2 words)

10. Asset not expected to be converted into cash within one year

**Down:**

1. Tax collected at the point of sale of goods (abbr.)

2. Commonly used accounting software by Indian SMEs

4. Document required to claim GST refund

5. Governing body for Chartered Accountants in India (abbr.)

6. A tax levied on income

***Note:*** *Be the first to solve the crossword puzzle and send your correct answers to [jalgaon@icai.org](mailto:jalgaon@icai.org). The participant who submits the correct solution first will receive an exciting prize and will be featured in the next issue of our publication.*

# DISCLAIMER

The views and opinions expressed or implied in this Newsletter are those of the authors or contributors and do not necessarily reflect those of Jalgaon Branch Of WIRC Of ICAI. Unsolicited articles and transparencies are sent in at the owners' risk and the publisher accepted no liability for loss or damage. Any information material in this publication may not be reproduced, whether in part or in whole, without the consent of Jalgaon Branch of WIRC of ICAI.

Jalgaon Branch of WIRC of ICAI is not in any way responsible for the results of any action taken on basis of the article published in the newsletter.

For any Suggestions and Queries please contact:

**CA Hitesh Agiwal (Branch Chairman) - 7588648980**